**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** सोनखेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0270 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/11/2025 19:55

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 25/11/2025

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 25/11/2025

**Time From (वेळेपासून):** 11:54 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/11/2025 **Time (वेळ):** 19:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 022

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/11/2025 19:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शेवडी बीट चे इमारती मध्ये पोलीस स्टेशन सोनखेड ,लोहा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** करीम खान सालार खान पठाण

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** सालार खान

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड ,विमानतळ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड ,विमानतळ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8668361977

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गणपत नागोराव गिते | | वडील का नाम : नागोराव | 1. सिडको नांदेड ,नांदेड ,सोनखेड ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/ रुपये ज्यात 500/ रुपये दराचे 10 ोटा | 5,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 25/11/2025

मी करीम खान सालार खान पठाण, वय 46 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 8668361977.

सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे दिनांक 09/06/2025 पासून पोलीस निरीक्षक (एक टप्पा पदोन्नती) म्हणून कार्यरत आहे.

आम्ही दि. 24/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कक्षात बोलावून राजू भिमराव गोडबोले, व्यवसाय शेतमजूरी, रा. मु.पो. बेटसांगवी, ता. लोहा जि नांदेड यांची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेशित केले.

त्यावरून आम्ही तक्रारदार श्री राजू गोडबोले यांना विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार यांनी सांगितले की, माझे वडीलांनी 1992 साली जवळा, ता. लोहा, जि. नांदेड या ठिकाणी 20 गुंठे जमीन घेतलेली आहे.त्या जमीनीला लागून असलेल्या शेजारी बाबासाहेब निवृत्ती धृतराज यांची जमीन आहे. त्यांचा व आमचा जमीनीचा वाद चालू आहे.

दिनांक 13/11/2025 रोजी आमचे बांधेकरी बाबासाहेब निवृत्ती धृतराज यांनी आमच्या शेतात प्रवेश करून आम्ही लावलेली तूर उपटून टाकले व आमच्या मालकीच्या शेतात ज्वारी पेरणी करू लागले. त्यावेळी मी, माझा भाउ व वडील असे त्या ठिकाणी गेलो. तिथे आमच्यामध्ये भांडण होवून हाणामारी झाली होती. त्यातून आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. त्यावेळी सोनखेड पोलीसांनी आम्हाला वैद्यकीय उपचारासाठी सरकारी दवाखाना, विश्णुपुरी, नांदेडला पाठविले.

दि. 13/11/2025 रोजी झालेल्या भांडणात मला, माझे वडील भिमराव दासराव गोडबोले व लहान भाउ गजानन भिमराव गोडबोले अशाना मार लागल्याने आम्ही सरकारी दवाखाना, विष्णुपुरी, नांदेड येथे वैद्यकीय उपचार घेवून दि. 17/11/2025 रोजी पोलीस स्टेशन सोनखेड येथे गेलो. माझे वडीलाचे तक्रारीवरून आमच्यासोबत भांडण करणारे 1. बाबासाहेब निवृत्ती धुतराज, 2. बबन निवृत्ती धुतराज, 3. सोनाली बबन धुतरात, 4. रत्नमाला विजय भोगरे, सर्व रा. सानेखडे, ता. लोहा, जि. नांदेड यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. त्या गुन्हयाचा तपास बीट जमादार गणपत गिते यांच्याकडे आहे आणि मी, माझे वडील व भाउ यांच्यावर बीट जमादार गणपत गिते यांनी 107 ची कारवाई केली.

त्यानंतर दि. 20/11/2025 रोजी मला बीट जमादार गणपत गिते यांनी पोलीस स्टेशन सोनखेड येथे बोलावून माझे रक्ताने भरलेले कपडे जप्त केले व माझे रक्ताचा नमूना घेतला. तेव्हा मी बीट जमादार गिते यांना आम्ही दाखल केलेल्या गुन्हयात आमच्या विरोधातील लोकांवर कारवाई कधी करता असे विचारले असता, त्यांनी त्यांच्यावर पण कारवाई करतो. तुम्हाला पण याच्यामध्ये मदत करतो. त्यासाठी खर्च लागेल असे म्हणून माझेकडून 10,000/- रूपये घेतले व आणखीन 10,000/- रूपये आणून दे, त्यानंतर तुझे विरोधातले लोकांवर पुढील कारवाई करतो असे म्हणाले.

बीट जमादार गिते हे मी दाखल केलेल्या गुन्हयातील लोकांवर पुढील कारवाई करण्यासाठी व मी दाखल केलेल्या गुन्हयात मदत करण्यासाठी मागत असलेले 10,000/- रूपये ही लाच असल्याची माझी खात्री झाल्याने व ती मला देण्याची ईच्छा नाही.

माझे व बीट जमादार गिते यांच्यामध्ये पैसे देणे-घेण्याचा कोणताही व्यवहार नसून आमच्यात वैर किंवा दुष्मनी नाही. तरी बीट जमादार गिते यांनी मी दाखल केलेल्या गुन्हयातील लोकांवर पुढील कारवाई करण्यासाठी माझेकडून 10,000/- रूपये लाच स्वतः किंवा इतरामार्फत घेतल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणेस विनंती आहे. वगैरे प्रमाणे तक्रार दिली आहे.

मा. पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, नांदेड यांनी जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांचे कार्यालयातून दोन पंच मागवून दोन पंच नामे 1) अरविंद शिवाजी भांडे, पद - उद्योग निरीक्षक, नेमणुक जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड 2) सोमेश सुधाकर आठवले, पद - उद्योग निरीक्षक, नेमणुक जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड हे उपलब्ध करून दिले.

दि. 25/11/2025 रोजी आम्ही खाजगी वाहन टोयोटो क्वालीस कार क्रमांक एमएच 18 टी 1111 मध्ये खाजगी इसम चालक श्री साईनाथ बामणे यांच्यासह पोलीस निरीक्षक श्रीमती प्रिती जाधव, पोहेकॉं/305 अरशद अहेमद खान असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेडचे कार्यालयातून 10.00 वाजता नांदेड येथून निघून सोनखेडच्या पुढे 11.10 वाजता आंबेसांगवी शिवारात जय शिवराय हॉटेलच्या परिसरात नियोजित निर्जनस्थळी जावून थांबलो. त्यानंतर थोडया वेळात तक्रारदार व त्यांचे वडील भिमराव गोडबोले हे तक्रारदार यांचे हिरो कंपनीचे स्प्लेंडर मोटार सायकल क्रमांक एम.एच. 26 डी.पी. 5606 वर त्याठिकाणी आले. दोन्ही पंचासमोर तक्रारदार यांनी परत तक्रारीचे तोंडी कथन केले. त्यानंतर दोन्ही पंचानी तक्रारदार यांनी दिनांक 24/11/2025 रोजी दिलेली लेखी तक्रार व तोंडी कथन करत असलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. ज्यावर आम्ही व तक्रारदार यांनी यापूर्वीच सहया केल्या होत्या. त्यानंतर आम्ही पंच, तक्रारदार असे सर्वोनुमते लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोह/अरशद अहेमद खान यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यांनतर पोह/अरशद अहेमद खान यांनी आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर बीट जमादार गिते यांच्या ठिकाण्याबाबत माहिती घेण्यासाठी तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांक 9325476023 यावरून बीट जमादार गिते यांचे मोबाईल क्रमांक 8888655866 वर वेळ 11.45 वाजता कॉल केला असता, त्यांनी पोलीस स्टेशन सोनखेड येथे असल्याचे कळवून पोलीस स्टेशन सोनखेडला येण्यास कळविले.

तेव्हा आम्ही तक्रारदार यांना लाच पडताळणी कारवाईसाठी पाठविण्याचा निर्णय घेवून आम्ही वेळ 11. 54 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात लटकावुन देवून तक्रारदार व पंच क्र. 01 अरविंद भांडे यांना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी पोलीस स्टेशन सोनखेड येथे रवाना केले. वेळ 13.11 वाजता तक्रारदार व पंच क्र. 01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.

त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 01 यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, बीट जमादार गिते हे पोलीस स्टेशन सोनखेड येथील त्यांचे बीटचे खोलीत होते. मी व पंच क्र. 1 असे सरळ त्यांचे खोलीत जावून बोललो, तेव्हा त्यांनी सांगितले की, ''तुच, तू करून टाक, काय असेल ते...... तुझ्या मनावर आता.... मी काय म्हणू आता...... तुझ्या याच्यान आता...... तु जे दिलास ते..... सगळ त्या गाडीवाल्याला बघितलासकी, तेवढे लोक आणून, आपण सगळ्या गोष्टी....... फॉरेन्सीकवाले हाय ते....... किती होतात ते दे..... किती होतात तुझ्याकडे........ ते बघ तुझ्या इच्छेने...... आता मला खर्च येवढा लागतो..... तुला सांगितलो थोडक्यात सांगितलो... एवढा खर्च झाल आता, अस...... अस...... कराव लागते. आणखीन कोर्टात माझी साक्ष लागते..... त्याच्या झेरॉक्स काढावे लागतात..... 10 सेट करावा लागते, प्रत्येकाला....... कोर्टाला लागते....... पी.पी. ला लागते........ आरोपीच्या वकीलाला लागते......... आरोपीचे चार प्रती लागतात....... मला लागते, सगळेच लागते........ दहा...... तुझ्या हिषोबाने दे.......हं.......'' तेव्हा तक्रारदार यांनी पाच हजार रूपये देवून टाकतो असे म्हणाले असता, लोकसेवक सपोउपनि गिते यांनी, ''बरं, तुझ्या हिशोबाने दे'' असे म्हणून लाचेची मागणी केल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक बीट जमादार गणपत गिते यांची भेटी दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यावरून तक्रारदार, पंच क्र 1 हे सांगत असलेली हकीकत व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण एकच असल्याचे निष्पन्न झाले.

तरी लोकसेवक गणपत गिते यांनी तक्रारदार यांनी दाखल केलेल्या गुन्ह्यातील आरोपीतांवर कारवाई करण्यासाठी व तक्रारदार यांना गुन्हयात मदत करण्यासाठी लाचेची मागणी करून तडजोडीअंती 5,000/-रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लाच स्विकृती सापळा कार्यवाही करण्याचे ठरले.

तक्रारदार यांनी त्यांचे जवळील 5,000/- रुपये रक्कम (ज्यात पाचशे रुपये दराच्या 10 भारतीय चलनी नोटा) पंचासमक्ष हजर केल्या. पोहेकॉं/अरशद अहेमद खान यांनी लाच रक्कम 5,000/- रूपये रकमेच्या भारतीय चलनी नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे शर्टच्या डाव्या खिशात अलगद ठेवून दिले.

त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक यॉंची भेट घेण्यासाठी त्यांचे गळयात 14.10 वाजता डिजीटल व्हॉईस

रेकॉर्डर चालू करून गळयात अडकावून पंच क्र. 1 यांच्यासोबत पोलीस स्टेशन सोनखेड येथे रवाना केले. त्यानंतर त्यांच्या पाठोपाठ आम्ही व सापळा पथक त्यांच्यावर नजर ठेवून त्यांच्या मागे मागे पोलीस स्टेशन सोनखेड समोर जावून थांबलो. त्यानंतर तक्रारदार हे 15.35 वाजता पोलीस स्टेशन सोनखेड ईमारतीच्या बाहेर मेन गेटजवळ आले व लोकसेवक यांनी लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर आम्ही व सापळा पथक तात्काळ पोलीस स्टेशन सोनखेडचे इमारतीत आलो. तेव्हा बीट जमादार गिते हे पोलीस स्टेशनच्या वायरलेस रूममध्ये होते. तेव्हा आम्ही त्यॉंना आमचा परिचय देवून त्यांच्यावर अँन्टी करप्षनची कारवाई झाल्याचे कळविले. तेव्हा आम्ही पंच क्र. 2 यांना लोकसेवक गणपत गिते यांच्या जिन्स पॅन्टच्या पाठीमागील डाव्या बाजूच्या खिष्यात ठेवलेले अँन्थ्रॉसिन पावडरयुक्त 5000/- रूपये लाचेची रक्कम मिळून आल्याचे दाखवून ती हस्तगत केली.

तरी तक्रारदार राजू भिमराव गोडबोले, रा. मु.पो. बेटसांगवी, ता. लोहा जि नांदेड यांनी दिनांक 24/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड येथे तक्रार दिली होती. त्यावरून दिनांक 25/11/2025 रोजी 11.54 ते 13.11 वाजण्याचे दरम्यान पोलीस स्टेशन सोनखेड इमारतीतील शेवडी बीटचे खोलीत शासकीय पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी, सापळा पुर्व कार्यवाही करण्यात आली. या कारवाई दरम्यान लोकसेवक गणपत नागोराव गिते, वय 50 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- सहा. पोलीस उप निरीक्षक/5283, नेमणुक पोलीस स्टेशन सोनखेड, ता. लोहा, जि. नांदेड यांनी तक्रारदार यांना त्यांनी दाखल केलेल्या गुन्हयातील आरोपीतांवर कारवाई करण्यासाठी व तक्रारदार यांना गुन्हयात मदत करण्यासाठी 10000/- रूपयाची मागणी करून तडजोडीअंती 5000/-रुपये लाच रक्कम स्विकारण्याची संमती दिली.
वेळ 14.10 ते 14.35 वाजण्याचे दरम्यान पोलीस स्टेशन सोनखेडचे इमारतीत शेवडी बीटचे खोलीमध्ये तक्रारदार यांचेकडून सपोउपनि गणपत गिते यांनी अँन्थ्रासिनयुक्त लाचेची रक्कम 5000/- रूपयाची लाच स्वतः स्विकारून त्यांचे जीन्स पॅन्टच्या पाठीमागील डाव्या खिश्यात ठेवलेली मिळून आली आहे. म्हणून माझी गणपत नागोराव गिते, वय 50 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- सहा. पोलीस उप निरीक्षक/5283, नेमणुक पोलीस स्टेशन सोनखेड, ता. लोहा, जि. नांदेड यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
PANDURANG VYAKANT MANE(I (Inspector)) / DGPPVMM8501 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PANDURANG VYAKA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPPVMM8501

**Attachment to Item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोपाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**